28 DEC 2025

तरूण भारत

# शिवाजी विद्यापीठ परिसर अभंगवाणीने दुमदुमणार

## 'संत साहित्य संमेलना'चे मंगळवारी आयोजन

प्रतिनिधी
कोल्हापूर

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, भाषाविकास संशोधन संस्था, कोल्हापूर आणि संत तुकाराम अध्यासन, शिवाजी विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवार, दि. ३० रोजी 'संत साहित्य संमेलना''चे आयोजन करण्यात आले आहे.

शिवाजी विद्यापीठातील राजर्षी शाहू सिनेट सभागृहात हे संमेलन होणार आहे. मंगळवारी सकाळी ९ वा. 'ग्रंथदिंडीने'' संमेलनाला प्रारंभ होणार आहे. ग्रंथदिंडीचे पालखी पूजन शिवाजी विद्यापीठाच्या प्रभारी प्र-कुलगुरू प्रा. डॉ. ज्योती जाधव यांच्या हस्ते होणार आहे.

ग्रंथदिंडी पारंपरिक वारकरी भजन, लेझिम आणि झिम्मा फुगडी यांच्या साथीने निघणार आहे. या संमेलनाचे उद्घाटन सकाळी ११ वा. उद्घाटक संत साहित्याचे अभ्यासक प्रा. डॉ. सदानंद मोरे यांच्या हस्ते होणार आहे. संमेलनाचे संमेलनाध्यक्ष संत साहित्याचे ज्येष्ठ अभ्यासक प्रा. डॉ. सतीश बडवे असणार आहेत. उद्घाटनसत्राच्या अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठाचे सन्माननीय प्रभारी कुलगुरू प्रा. डॉ. सुरेश गोसावी असणार आहेत. उद्घाटन सत्रास प्रा. डॉ. प्रमोद मुनघाटे, प्रा. प्रवीण बांदेकर, प्रा. रणधीर शिंदे, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे हे प्रमुख पाहुणे असणार आहेत.

### परिसंवादाचे आयोजन

संमेलनामध्ये दुपारी १२.३० ते २ या वेळेत 'वारकरी संप्रदायाचे महाराष्ट्राच्या जडणघडणीत योगदान' या विषयावरील परिसंवादाचे आयोजन केले आहे. या परिसंवादात तरूण भारत संवादचे विभागीय संपादक श्रीरंग गायकवाड, ज्ञानेश्वर बंडगर, प्रा. डॉ. गोविंद काजरेकर, प्रा. प्रभाकर देसाई, प्रा. प्रवीण बांदेकर, प्रा. अनिल गवळी सहभागी होणार आहेत. तर परिसंवादाचे अध्यक्ष प्रा. प्रमोद मुनघाटे असणार आहेत.

### वारी एक आनंदयात्रा, कबीरपंथी भजन, अभंगवाणी

संमेलनात ३ ते ४ या वेळेत 'वारी एक आनंदयात्रा' या विषयावर ज्येष्ठ छायाचित्रकार आणि वारीचे अभ्यासक संदेश भंडारे यांची मुलाखत होणार आहे. या मुलाखतीचे संवादक ज्ञानेश्वर बंडगर असणार आहेत. सायंकाळी श्री दत्त भजनी मंडळ, शिपूर यांचे 'कबीरपंथी भजन' आणि शिवाजी विद्यापीठाच्या संगीत व नाट्यशास्त्र विभागातर्फे 'अभंगवाणी' कार्यक्रम होईल.

28 DEC 2025

जनप्रवास

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


# सोशल मीडियावरील माहितीसंदर्भात सावध रहा

## डॉ. शिवाजी जाधव : सातदिवसीय मीडिया लेखन कार्यशाळेच्या समारोप

**जनप्रवास : कोल्हापूर**

भारतीय पत्रकारितेची वाटचाल ही संघर्ष, सामाजिक जाणीव आणि निर्भीड विचारांवर आधारित राहिली आहे. देशातील प्रारंभीच्या वर्तमानपत्रांनी आर्थिक अडचणी, सामाजिक दबावांचा सामना करत पत्रकारितेचा पाया भक्कम केला. महाराष्ट्रातील मराठी पत्रकारितेनेही अशाच कठीण परिस्थितीत आपली ओळख निर्माण केली. या अनुभवांतूनच जबाबदार आणि निःपक्ष पत्रकार घडतो, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या मास कम्युनिकेशन विभागाचे प्रमुख डॉ. शिवाजी जाधव यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या हिंदी विभागात आयोजित सातदिवसीय मीडिया लेखन कार्यशाळेच्या समारोपप्रसंगी ते बोलत होते.




शिवाजी विद्यापीठाच्या आयोजित कार्यक्रमात मार्गदर्शन करताना डॉ. शिवाजी जाधव. सोबत डॉ. तृप्ती करेकट्टी आदी.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी हिंदी विभागप्रमुख डॉ. तृप्ती करेकट्टी उपस्थित होत्या.

डॉ. जाधव म्हणाले, माध्यमातील मजकुराकडे नागरिकांनी चिकित्सक दृष्टीने पाहण्याची गरज अधोरेखित केली. माध्यमांमध्ये प्रसिद्ध होणाऱ्या बातम्यांवर प्रश्न विचारले गेले, तर माध्यमांची गुणवत्ता उंचावू शकते. सोशल मीडियावर वेगाने पसरवली जाणारी माहिती अनेकदा अपुरी किंवा दिशाभूल करणारी असू शकते. त्यामुळे कोणतीही बातमी स्वीकारण्यापूर्वी तिची सत्यता तपासणे आवश्यक आहे, असे त्यांनी स्पष्ट केले. डिजिटल माध्यमांमुळे माहितीचा प्रचंड प्रसार झाला असून, त्यातून माहितीचे प्रदूषण वाढत असल्याची चिंता त्यांनी व्यक्त केली. अशा काळात पत्रकारांनी सामाजिक बांधिलकी जपत जबाबदारीने काम करणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. अध्यक्षीय भाषणात डॉ. तृप्ती करेकट्टी यांनी या कार्यशाळेमुळे विद्यार्थ्यांमध्ये मीडिया लेखनाबाबत नवी दृष्टी आणि आत्मविश्वास निर्माण होईल, असा विश्वास व्यक्त केला. संदीप बरगे व स्वप्नाली धुलुगडे यांनी मनोगत व्यक्त केले. डॉ. जयसिंग कांबळे यांनी कार्यक्रमाचे नियोजन केले. सूत्रसंचालन अविनाश कांबळे यांनी केले. आभार प्रदर्शन श्रीकांत देसाई यांनी केले.

28 DEC 2025

जनप्रवास



# शिवाजी विद्यापीठात मंगळवारी संत साहित्य संमेलन

**कोल्हापूर :** राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, भाषाविकास संशोधन संस्था, कोल्हापूर आणि संत तुकाराम अध्यासन, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने ३० डिसेंबर २०२५ रोजी राजर्षी शाहू सिनेट सभागृहात 'संत साहित्य संमेलन' होत आहे. सकाळी ९ वाजता 'ग्रंथदिंडीने' होणार आहे. ग्रंथदिंडीचे पालखी पूजन प्रभारी प्र-कुलगुरू, डॉ. ज्योती जाधव यांच्या हस्ते होणार आहे. ग्रंथदिंडी पारंपरिक वारकरी भजन, लेझिम आणि झिम्मा फुगडी यांच्या साथीने निघणार आहे.

28 DEC 2025

अनुप्रवास

# अधिविभागात शोधनिबंध स्पर्धा उत्साहात

कोल्हापूर :विभागस्तरीय शोधनिबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. शिक्षणशास्त्र विभागातील डॉ. विद्यानंद खंडागळे यांचे स्पर्धेसाठी मार्गदर्शन लाभले. स्पर्धेचे परीक्षक म्हणून डॉ. राजेंद्र भोई, डॉ. लता पाटील व प्राची जगताप यांनी काम पाहिले. यावेळी शिक्षणशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. चेतना प्र. सोनकांबळे, डॉ. रुपाली संकपाळ उपस्थित होत्या.

28 DEC 2025
पुढारी

# विद्यापीठात ३० रोजी संत साहित्य संमेलन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

मराठी भाषा विभाग, महाराष्ट्र शासन, राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई व भाषा विकास संशोधन संस्था आणि शिवाजी विद्यापीठांतर्गत संत तुकाराम अध्यासन यांच्या संयुक्त विद्यमाने दि. ३० डिसेंबर रोजी राजर्षी शाहू सिनेट सभागृहात 'संत साहित्य संमेलन २०२५'चे आयोजन केले आहे. ग्रंथदिंडीने संमेलनास सुरुवात होईल. सकाळी प्रभारी कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्या हस्ते पालखी पूजन होणार आहे. यावेळी पारंपरिक वारकरी भजन, लेझिम आणि झिम्मा फुगडी कार्यक्रम होणार आहे. त्यानंतर महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबईचे अध्यक्ष डॉ. सदानंद मोरे यांच्या हस्ते संमेलनाचे उद्घाटन होणार आहे. प्रा. डॉ. सतीश बडके संमेलनाध्यक्ष असतील. प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी हे सत्राध्यक्ष असणार आहेत. संगीत व नाट्यशास्त्र विभागाच्या अभंगवाणीने सायंकाळी संमेलनाचा समारोप होईल.

28 DEC 2025
पुण्यनगरी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात मंगळवारी संत संमेलनाचे आयोजन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठात मंगळवार, दि. ३० डिसेंबर रोजी 'संत साहित्य संमेलन' होणार आहे. हे संमलेन महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, भाषाविकास संशोधन संस्था, कोल्हापूर आणि संत तुकाराम अध्यासन, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने राजर्षी शाहू सिनेट सभागृह, शिवाजी विद्यापीठ येथे आयोजित करण्यात आले आहे. संत साहित्य संमेलनामध्ये सर्वांनी उत्स्फूर्त सहभागी व्हावे, असे आवाहन पत्रकार परिषदेमध्ये संत तुकाराम अध्यासनाचे समन्वयक प्रा. नंदकुमार मोरे यांनी केले.

संमेलनाची सुरुवात सकाळी ९ वाजता 'ग्रंथदिंडीने' होणार आहे. ग्रंथदिंडीचे पालखी पूजन प्र. कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्या हस्ते होणार आहे. ग्रंथदिंडी पारंपरिक वारकरी भजन, लेझीम आणि झिम्मा-फुगडी यांच्या साथीने निघणार आहे.

संमेलनाचे उद्घाटन सकाळी ११ वाजता संत साहित्याचे अभ्यासक प्रा. डॉ. सदानंद मोरे यांच्या हस्ते होणार आहे. संमेलनाध्यक्ष संत साहित्याचे ज्येष्ठ अभ्यासक प्रा. डॉ. सतीश बडवे असणार आहेत, तर उद्घाटन सत्राच्या अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी असणार आहेत. उद्घाटन सत्रामध्ये प्रमुख उपस्थिती म्हणून डॉ. प्रमोद मुनघाटे, प्रा. प्रवीण बांदेकर, प्रा. रणधीर शिंदे, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे असणार आहेत. संमेलनामध्ये दुपारी १२.३० ते २ या वेळेत 'वारकरी संप्रदायाचे महाराष्ट्राच्या जडणघडणीत योगदान' या विषयावरील परिसंवादाचे आयोजन केले आहे. या परिसंवादामध्ये ज्ञानेश्वर बंडगर, श्रीरंग गायकवाड, डॉ. गोविंद काजरेकर, प्रा. प्रभाकर देसाई, प्रा. प्रवीण बांदेकर, प्रा. अनिल गवळी सहभागी होणार आहेत, तर परिसंवादाचे अध्यक्ष प्रा. प्रमोद मुनघाटे असणार आहेत.

संमेलनामध्ये ३ ते ४ या वेळेत 'वारी एक आनंदयात्रा' या विषयावर ज्येष्ठ छायाचित्रकार आणि वारीचे अभ्यासक संदेश भंडारे यांची मुलाखत होणार आहे. या मुलाखतीचे संवादक ज्ञानेश्वर बंडगर असणार आहेत. सायंकाळी श्री दत्त भजनी मंडळ, शिपूर यांचे 'कबीरपंथी भजन' आणि शिवाजी विद्यापीठाच्या संगीत व नाट्यशास्त्र विभागाच्या 'अभंगवाणी' या कार्यक्रमाचे आयोजन केले आहे.

28 DEC 2025
सकाळ

# विद्यापीठात मंगळवारी संत साहित्य संमेलन

कोल्हापूर, ता. २७ : महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, भाषाविकास संशोधन संस्था व शिवाजी विद्यापीठातील संत तुकाराम अध्यासनाच्या संयुक्त विद्यमाने मंगळवारी (ता. ३०) संत साहित्य संमेलन होत आहे. संत साहित्याचे अभ्यासक प्रा. डॉ. सदानंद मोरे यांच्याहस्ते व प्रा. डॉ. सतीश बडवे व डॉ. प्रमोद मनुघाटे यांच्या प्रमुख उपस्थितीत सकाळी अकरा वाजता संमेलनाचे उद्घाटन होईल. राजर्षी शाहू सिनेट सभागृहात संमेलन होईल.

संमेलनाची सुरुवात सकाळी नऊ वाजता ग्रंथदिंडीने होणार असून, त्यात पारंपरिक वारकरी भजन, लेझीम, झिम्मा फुगडीचा समावेश असेल. दुपारी साडेबारा ते दोन या वेळेत 'वारकरी संप्रदायाचे महाराष्ट्राच्या जडणघडणीत योगदान' या विषयावर परिसंवाद होईल. दुपारी तीन ते चार या वेळेत 'वारी एक आनंदयात्रा' विषयावर ज्येष्ठ छायाचित्रकार संदेश भंडारे यांची मुलाखत होणार असून, शिपूर येथील दत्त भजनी मंडळाचे 'कबीरपंथी भजन' व विद्यापीठाच्या संगीत व नाट्यशास्त्र विभागाचा 'अभंगवाणी' कार्यक्रम होईल. संमेलनात सर्वांनी सहभागी व्हावे, असे आवाहन अध्यासनाचे समन्वयक प्रा. नंदकुमार मोरे यांनी केले आहे.

28 DEC 2025
लोकमत

# शिवाजी विद्यापीठात मंगळवारी संत साहित्य संमेलनाचे आयोजन

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, भाषा विकास संशोधन संस्था, कोल्हापूर आणि संत तुकाराम अध्यासन, शिवाजी विद्यापीठ यांच्यातर्फे मंगळवार, दि. ३० डिसेंबर रोजी राजर्षी शाहू सिनेट सभागृहात 'संत साहित्य संमेलन' होत आहे.

'ग्रंथदिंडीने' या संमेलनाचा प्रारंभ सकाळी ९ वाजता होणार आहे. प्रभारी प्र. कुलगुरू प्रा. डॉ. ज्योती जाधव यांच्या हस्ते पालखी पूजन होणार आहे. पारंपरिक वारकरी भजन, लेझिम आणि झिम्मा फुगडीसह ग्रंथदिंडी निघणार आहे. संमेलनाचे उद्घाटन सकाळी ११ वाजता प्रा. डॉ. सदानंद मोरे यांच्या हस्ते होणार आहे. ज्येष्ठ अभ्यासक प्रा. डॉ. सतीश बडवे संमेलनाध्यक्ष आहेत, उद्घाटनसत्राच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू प्रा. डॉ. सुरेश गोसावी आहेत. प्रा. डॉ. प्रमोद मुनघाटे, प्रा. प्रवीण बांदेकर, प्रा. रणधीर शिंदे, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे प्रमुख उपस्थित असणार आहेत. दुपारी महाराष्ट्राच्या जडणघडणीत योगदान' या विषयावरील परिसंवादात ज्ञानेश्वर बंडगर, श्रीरंग गायकवाड, प्रा. डॉ. गोविंद काजरेकर, प्रा. प्रभाकर देसाई, प्रा. प्रवीण बांदेकर, प्रा. अनिल गवळी सहभागी होणार आहेत. प्रा. प्रमोद मुनघाटे अध्यक्ष आहेत. सायंकाळी 'वारी एक आनंदयात्रा' या विषयावर संदेश भंडारे यांची मुलाखत ज्ञानेश्वर बंडगर घेणार आहेत. अशी माहिती संत तुकाराम अध्यासनाचे समन्वयक प्रा. नंदकुमार मोरे यांनी यावेळी दिली.